उष्णतेच्या लाटेमुळे होणारे नूकसान / जिवित हानी
कमीत कमी व्हावी यासाठी जनजागृती अभियान.....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग (आपत्ती व्यवस्थापन प्रभाग)
शासन निर्णय क्र.:- आव्यप्र-२०१८/प्र.क्र.७८/आव्यप्र-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०३ मे, २०१८

<u>प्रस्तावना :-</u>

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम,२००५ मधील तरतूदीनुसार आपत्ती व्यवस्थापनासाठी करावयाची खरेदी, घ्यावयाच्या सेवा तसेच क्षमताबांधणी, जनजागृती, प्रशिक्षण इत्यादी बाबत आवश्यक कार्यवाही करण्याची जबाबदारी आपत्ती व्यवस्थापन प्रभागावर आहे. त्यासाठी दिनांक २०.०४.२०१८ रोजी झालेल्या राज्य कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये आपत्ती व्यवस्थापनासाठी करावयाच्या खर्चाचे अधिकार आपत्ती व्यवस्थापन प्रभागास दिलेले आहेत. त्यानुषंगाने विभागांतर्गत करावयाची खरेदी घ्यावयाच्या सेवा यासाठी विभागांतर्गत निविदा समिती / खरेदी समितीची स्थापना महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक २१ एप्रिल २०१८ अन्वये करण्यात आली आहे.

भारतीय हवामान खात्याने यावर्षी देशाच्या विविध भागात उष्णतेची लाट येवून सदर लाट दिर्घकाळ राहण्याचा अंदाज वर्तविला आहे. देशातील संभाव्य तीव्र उष्णतेच्या लाटेचा अंदाज विचारात घेऊन राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने उष्णतेच्या लाटेसंदर्भात फेब्रुवारी २०१८ मध्ये राष्ट्रीय स्तरावर कार्यशाळेचे आयोजन केले होते. संभाव्य उष्णतेच्या लाटेमुळे होणारे नूकसान / जिवित हानी कमीत कमी व्हावी यासाठी सर्व राज्यांनी प्रयत्न करावे असे राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने या कार्यशाळेत स्पष्ट केले. अमेरिकेतील नॅचरल रिसोर्सेस डिफेन्स कौन्सिलच्या प्रतिनिधींनी या कार्यशाळेत भारतीय हवामान खात्याचा उष्णतेच्या लाटेबाबतचा अंदाज गांभिर्याने घेऊन प्रभावित होणाऱ्या सर्व राज्यांनी योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत सूचित केले आहे.

चालू वर्षी राज्याच्या सर्व भागात तापमानात सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे राज्याच्या ग्रामीण भागात शेतावर किंवा शासनाच्या विविध योजनांवर उन्हामध्ये काम करणारे शेतकरी, शेतमजूर आणि अन्य कार्यरत व्यक्ती पुरेशा सुरक्षेविना किंवा आवश्यक साहित्य उदा. पाणी, कांदा इत्यादी सोबत न घेता गेल्यास तीव्र उन्हाच्या तडाख्यामुळे अशा व्यक्तींना भयंकर परिणामांना सामोरे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे उष्माघतापासून राज्यातील जनतेने स्वसंरक्षार्थ काय करावे याबाबत आकाशवाणी मुंबई यांनी या विभागाच्या निविदा समितीपुढे केलेल्या सादरीकरणांनतर आकाशवाणीच्या माध्यमातून जनजागृती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

भारतीय हवामान खात्याने सन २०१८ च्या उन्हाळ्यात देशाच्या विविध भागांमध्ये उष्णतेची लाट लवकर येवून दिर्घकाळ राहण्याचा अंदाज वर्तविला दिनांक ५ मे २०१८ ते दिनांक १३ जून २०१८ (एकूण ४० दिवस) या कालावधीत उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी काय करावे व काय करु नये याबाबतची माहितीपर आणि जनजागृती विषयक संदेश प्रसारणाचे काम आकाशवाणी मुंबई यांना देण्यास आणि त्यासाठी होणाऱ्या रु. ८,४३,७२४./- (रुपये आठ लक्ष त्रेचाळीस हजार सातशे चोवीस फक्त) एवढ्या खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर आदेश वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२ एप्रिल, २०१८ आणि वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२ दिनांक १७ एप्रिल २०१५ वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८, भाग- पहिला, उपविभाग-तीन अनु.४, परिच्छेद क्रमांक २७ (२) अन्वये प्रशासनीक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

याकामी होणारा खर्च मागणी क्रमांक सी-६, २२४५-नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ८०- सर्वसाधारण ००१ संचालन व प्रशासन (०१) महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (०१) (०१) महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे कार्यालय स्थापन करणे व फर्निचर व साधनसामुग्रीसह सुसज्जीकरण करणे (२२४५ १७६१) ३१,सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१४१५३८५५७६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावाने

Shrirang Shripati Gholap

Digitally signed by Shrirang Shripati Gholap
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DMU/R AND R, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e1b6e289fe7dcde27c972916398d8220a134ed8ebf6439e54d1927c5c4b28bec, cn=Shrirang Shripati Gholap
Date: 2018.05.14 15:39:03 +05'30'

(श्रीरंग घोलप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. आकाशवाणी, मुंबई.
२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३. महालेखाकार (महाराष्ट्र -१), मुंबई.
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५. वित्तीय सल्लागार व सह सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
६. महाव्यवस्थापक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई सेन्ट्रल, मुंबई.
७. लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती.